# इतिहास – राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 2 री

**प्र. 1. (अ)**

(1) ‘आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज’ हा ग्रंथ मायकेल फुको याने लिहिला.

(2) महाराष्ट्रात तयार होणाऱ्या लाकडी बाहुलीला ‘ठकी’ असे म्हणत.

(3) कोलकाता येथील ‘भारतीय संग्रहालय’ हे भारतातील पहिले संग्रहालय होय.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**


(1) वंचितांचा इतिहास – रामचंद्र गुहा.

(2) रम्मन – पश्चिम बंगालमधील नृत्य.

(3) एकच प्याला – अण्णासाहेब किर्लोस्कर.

**प्र. 2. (अ)**

**(1)**




**(2)**

**इतिहासलेखनाचे टप्पे**

↓

**ऐतिहासिक माहितीचे संकलन करणे व माहितीचे संदर्भ तपासणे.**

↓

माहितीचे तौलनिक विश्लेषण करणे.

↓

इतिहासाच्या साधनांचे चिकित्सक संशोधन करणे.


↓

ऐतिहासिक संदर्भांशी निगडित योग्य प्रश्नांची मांडणी करणे.

↓

संभाव्य परिकल्पनांची वा सिद्धान्तांची मांडणी करणे.

(3)




**प्र. 2. (ब) (1) अभिलेखागार :**

(१) ऐतिहासिक दस्तऐवज ज्या ठिकाणी जतन करून ठेवलेले असतात, त्या ठिकाणास 'अभिलेखागार' असे म्हणतात.

(२) अभिलेखागारांमध्ये महत्त्वाची जुनी कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, जागतिक करारांचे ऐवज इत्यादी जतन करून ठेवले जाते.

(३) अभिलेखागारांमुळे मूळ कागदपत्रांचे संदर्भ मिळतात. तत्कालीन ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करता येतो. तत्कालीन भाषा, लिपी यांचा शोध घेता येतो. कालगणना करता येते. ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांना हस्तांतरित करता येतो.

(४) भारताचे दिल्ली येथील राष्ट्रीय अभिलेखागार हे आशिया खंडातील सर्वांत मोठे अभिलेखागार आहे. भारतातील प्रत्येक राज्याचे स्वत:चे स्वतंत्र अभिलेखागारही आहे.

**(2) वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्यसंग्रामातील कार्य :**

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात वर्तमानपत्रांनी पुढील कार्य केले –

(१) लोकजागृती व लोकशिक्षण केले. भारतीय संस्कृतीची व इतिहासाची थोरवी वर्णन केली.

(२) सामाजिक, धार्मिक व राजकीय चळवळींना पाठिंबा देऊन साम्राज्यवादी धोरणांना विरोध केला.

(३) पाश्चात्त्य विद्या व शिक्षण जनतेपर्यंत पोहोचवून समाजप्रबोधनाचे काम केले.

(४) तत्कालीन सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना वाचा फोडली. त्याचबरोबर समाजसुधारक, नेते व संघटना यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवले.

**(3) मार्को पोलो :**

(१) मार्को पोलो या जगप्रवाशाचा जन्म इ.स. १२५४ मध्ये इटलीतील व्हेनिस या शहरात एका व्यापारी कुटुंबात झाला.

(२) तेराव्या शतकाच्या अखेरीस रेशीम मार्गावरून चीनपर्यंत प्रवास करणारा तो पहिला युरोपियन होय. त्याने लिहिलेले प्रवासवर्णन हा पश्चिम आशियाची माहिती देणारा स्रोतग्रंथ ठरला.

(३) आशियातील समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, निसर्ग आणि व्यापार यांची ओळख त्याने आपल्या ग्रंथातून जगाला करून दिली. यातूनच युरोप व आशिया यांच्यात संवाद व व्यापार सुरू झाला.

(४) भारताच्या दक्षिण किनारपट्टीतूनही त्याने प्रवास केला. दक्षिणेतील मलबार प्रांताचे लोकजीवन, तेथील गूढविद्या यांचेही वर्णन त्याने आपल्या पुस्तकात केले आहे.

**प्र. 3.**

**(1)** (१) इतिहासलेखनात पुरुषप्रधान दृष्टिकोनाचा प्रभाव होता. सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने इतिहासलेखनात स्त्रीवादी भूमिका मांडली.

(२) त्यामुळे स्त्रीवादी इतिहासलेखनात स्त्रियांचा समावेश केला गेला.

(३) इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्यावर भर दिला.

(४) सीमाँ-द-बोव्हा यांच्या या स्त्रीवादी भूमिकेमुळे स्त्रियांशी संबंधित नोकरी, ट्रेड युनियन, स्त्रियांचे कौटुंबिक जीवन यांच्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.

**(2)** (१) पूर्वजांनी निर्माण केलेल्या कलाकृती, परंपरा हा आपला सांस्कृतिक वारसा असून त्यांविषयी आपल्या मनात आपुलकी असते.

(२) हा वारसा पुढील मानवी पिढ्यांच्या हितासाठी जपणे व त्याचे संवर्धन होणे गरजेचे असते.

(३) काळाच्या ओघात हा ठेवा नामशेष होता कामा नये.

(४) यासाठी त्याचे जतन कसे करावे याच्या दिशादर्शक तत्त्वांच्या आधाराने जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे व परंपरा यांची यादी 'युनेस्को' या जागतिक संघटनेकडून जाहीर केली जाते.

**(3)** (१) शेकडो वर्षांच्या कालखंडात ग्रीक, अरब, मुघल, ब्रिटिश असे अनेक शासक भारतात आले.

(२) त्यांच्या राजवटीत भारतीय लोकांचा त्यांच्या ललितकलांशीही संबंध आला.

(३) या संबंधांमुळे कलांच्या सादरीकरणामध्येही अनेक प्रवाह मिसळत गेले.

(४) त्यातून गायन, वादन, नृत्य यांच्या नवनव्या शैली निर्माण झाल्या. त्यामुळे भारतीय ललितकला अधिकाधिक समृद्ध होत गेल्या.

**(4)** (१) इतिहास संशोधन करताना इतिहासाची साधने मिळवणे, सूची तयार करणे, साधनांचे जतन करणे, ती प्रदर्शित करणे अशी विविध कामे काळजीपूर्वक करावी लागतात.

(२) प्रत्येक कामाचे कौशल्य वेगवेगळे असते.


(३) प्रत्येक कामाची कृती वेगवेगळी असते. पूर्वतयारीही वेगवेगळी करावी लागते.

(४) या सर्व कृती करताना कोणती सावधानता बाळगली पाहिजे, हे माहीत असले पाहिजे. प्रशिक्षणाखेरीज या बाबी कळू शकत नाहीत.

म्हणून इतिहास संशोधन करताना विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

**प्र. 4.**

**(1)**




**(2)** खेळांना उत्तेजन देण्यासाठी सरकार खेळाडूंना शिष्यवृत्ती देते; तसेच आपल्या आस्थापनांमध्ये त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवते.

**(3)** खेळाशी अनेक घटक संबंधित असतात. त्यातूनच पुढील अनेक व्यावसायिक संधी प्राप्त होतात–

(१) खेळांसंबंधी लेखन करणारे लेखक व समीक्षक.

(२) आकाशवाणी, दूरदर्शन व विविध वाहिन्यांवरून खेळांचे समालोचन करणारे समालोचक, तज्ज्ञ व त्यांना माहिती पुरवणारे साहाय्यक.

(३) खेळाडूंना शिकवणारे प्रशिक्षक, मैदान तयार करणारे तज्ज्ञ, पंच इत्यादी.

(४) खेळांचे चित्रीकरण करणारे कॅमेरामन व त्यांचे साहाय्यक आणि संगणक तज्ज्ञ. खासगी आस्थापनांमध्ये खेळाडूंसाठी राखीव जागा ठेवण्यात येतात.

**प्र. 5.**

**(1)** (१) समाजातील दुर्लक्षित समूहाच्या लोकपरंपरांचा इतिहास म्हणजे 'वंचितांचा इतिहास' होय.

(२) या वंचितांच्या इतिहासाचा विचार एकोणिसाव्या–विसाव्या शतकात महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांनी आपल्या लेखनात मांडला.

(३) 'गुलामगिरी' या ग्रंथात महात्मा फुले यांनी समाजातील शूद्रातिशूद्रांचा इतिहास नव्याने उलगडून दाखवला.

(४) धर्माच्या, जातीच्या आणि परंपरांच्या नावाखाली होणारे स्त्रियांचे आणि शूद्रांचे शोषण कसे होते, हे दाखवून दिले.

(५) भारताच्या राजकीय व सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असूनही भारताच्या वसाहतवादी आणि राष्ट्रवादी इतिहासलेखनात त्याकडे दुर्लक्ष झाले, हे डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले.

(६) दलितांवरील अन्याय हाच विषय त्यांच्या सर्व लेखनाचा गाभा होता. 'हू वेअर द शूद्राज' आणि 'द अनटचेबल्स' हे त्यांचे दोन ग्रंथ वंचितांच्या इतिहासावरच आहेत.

**(2)** वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्या प्रकाशनाचा कालावधी, त्यांचे स्वरूप आणि उद्देश यांत वेगळेपणा आढळतो. या दोन्हींमधील फरक पुढीलप्रमाणे –

| क्र. | वृत्तपत्रे | क्र. | नियतकालिके |
|---|---|---|---|
| १. | वृत्तपत्रे ही चालू घडामोडींचा ऐतिहासिक दस्तऐवज असतो. | १. | नियतकालिकांमध्ये ताज्या बातम्यांना महत्त्व नसते. |
| २. | वृत्तपत्रांत बातम्या, लेख, स्तंभलेख, अग्रलेख इत्यादींना महत्त्व असते. | २. | नियतकालिके विषयांना प्राधान्य देऊन त्यावर लेख प्रसिद्ध करतात. |
| ३. | वृत्तपत्रे दररोज प्रकाशित होतात. त्यांना 'दैनिक' असेही म्हटले जाते. | ३. | प्रकाशनाच्या कालावधीवरून नियतकालिकांना साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, वार्षिक इत्यादी म्हटले जाते. |
| ४. | स्थानिक, देशांतर्गत व जागतिक स्वरूपाच्या बातम्या ताबडतोब पुरवणे, हा वृत्तपत्रांचा मुख्य हेतू असतो. | ४. | बातम्या न पुरवता मनोरंजक व ज्ञानवर्धक मजकूर पुरवणे, हा नियतकालिकांचा हेतू असतो. |
| ५. | वृत्तपत्रे विशिष्ट विषयाला बांधलेली नसतात. समाजातील घडणाऱ्या सर्व घटना लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य वृत्तपत्रे करतात. | ५. | नियतकालिके विशिष्ट विषयांना वाहिलेली असतात. वाङ्मयीन भाषा, लिखाणपद्धती आणि बाह्यस्वरूप या दृष्टीने नियतकालिके वृत्तपत्रांपेक्षा वेगळी असतात. |
| ६. | वृत्तपत्रांचे महत्त्व तात्कालिक असते. लोकमत घडवणे, जागृत करणे आणि शासनसंस्थेवर अंकुश ठेवणे हे वृत्तपत्रांचे हेतू असतात. | ६. | विविध विषयांची विपुल माहिती दिली जात असल्याने नियतकालिके अभ्यासाची, संशोधनाची आणि इतिहासाची महत्त्वपूर्ण साधने मानली जातात. |

**(टीप :** *फरकाचे कोणतेही किमान तीन मुद्दे लिहिणे आवश्यक आहे.***)**

**(3)** (१) दादासाहेब फाळके यांनी १९१३ साली 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला मराठी चित्रपट प्रदर्शित केला. या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी स्वत:च केले होते. या चित्रपटाची संपूर्ण निर्मितीप्रक्रिया त्यांनी स्वत: भारतात केली, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य.

(२) त्यानंतर त्यांनी मोहिनी—भस्मासुर व सत्यवान—सावित्री हे मूकपट तयार केले.

(३) त्यांनी वेरूळची लेणी व नाशिक-त्र्यंबकेश्वर ही तीर्थक्षेत्रे यांवर अनुबोधपट तयार केले. अनुबोधपटाच्या जनकत्वाचाही मान त्यांच्याकडे जातो.

(४) पुढे त्यांनी ऐतिहासिक, पौराणिक विषयांवरचेही चित्रपट तयार केले.

(५) 'फाळकेज फिल्म लिमिटेड' ही स्वत:ची चित्रपटनिर्मिती संस्था स्थापन केली. या संस्थेने ४० चित्रपट निर्माण केले.

(६) 'गंगावतरण' हा त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिला बोलपट १९३७ साली प्रदर्शित झाला.

म्हणूनच दादासाहेब फाळके यांना 'भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक' असे म्हटले जाते.

**(4)** पर्यटनाचे अनेक प्रकारांत वर्गीकरण करण्यात येते. यांतील प्रमुख तीन प्रकार —

(१) **ऐतिहासिक पर्यटन :** पर्यटन आणि इतिहास यांचे नाते अतूट आहे. म्हणूनच जगभरातील पर्यटकांचा ऐतिहासिक ठिकाणे पाहण्यासाठी ओघ वाढतच आहे. आपल्या पूर्वजांचे पराक्रम, त्यांनी निर्मिलेल्या वास्तू पाहणे हा कुतूहलाचा विषय असतो. जगभरातच असे ऐतिहासिक पर्यटन मोठ्या प्रमाणात केले जाते.

(२) **भौगोलिक पर्यटन :** निसर्गराजीत राहायला, निसर्गाचा आनंद उपभोगायला प्रत्येकालाच आवडतो. निसर्गाची ओढ, कुतूहल आणि विरंगुळा यांसाठी जगभरातील लोक अशा ठिकाणांना भेटी देतात. हे भौगोलिक पर्यटन होय.

(३) **आंतरराष्ट्रीय पर्यटन :** आधुनिक काळात झालेल्या वाहतुकीच्या सोयींमुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन वाढले आहे. आंतरराष्ट्रीय परिषदा, विश्वसंमेलने, बैठका, व्यावसायिक कामे, स्थलदर्शन, धार्मिक स्थळांना भेटी आदी निमित्ताने आंतरराष्ट्रीय पर्यटन मोठ्या प्रमाणात चालते. आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरण यांमुळे आंतरराष्ट्रीय पर्यटनाला चालना मिळालेली आहे.

**प्र. 6**.

**(1)** महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी <u>५०</u> टक्के जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

**(2)** लोकशाही अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी शासनाने <u>सत्तेचे विकेंद्रीकरण</u> ही उपाययोजना राबवली.

**प्र. 7**.

**(1)** हे विधान <u>चूक</u> आहे; कारण—

(१) भारताची प्रचंड लोकसंख्या आणि देशाचा मोठा विस्तार लक्षात घेता विविध पातळींवर निवडणुका घेणे, ही बाब आव्हानात्मक आहे. हे आव्हान भारतीय लोकशाहीने यशस्वी केलेले आहे.

(२) ठरावीक मुदतीनंतर देशात मुक्त आणि न्याय्य वातावरणात निवडणुका घेणे, हे लोकशाहीचे यश आहे.

(३) कालबद्ध होणाऱ्या निवडणुकांमुळे मतदारांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ झाल्या आहेत; त्यामुळे मतदान करणाऱ्यांच्या संख्येतही वाढ झालेली दिसते. जनतेच्या या राजकीय सहभागाचा विचार करता भारतीय लोकशाही मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसते.

**(2)** हे विधान <u>बरोबर</u> आहे; कारण—

(१) चळवळ हे लोकांचे विशिष्ट प्रश्नाभोवती निर्माण झालेले संघटन असते.

(२) लोकांच्या प्रश्नांशी निगडित असणाऱ्या चळवळीसच लोक पाठिंबा देतात.

(३) लोकांच्या हिताच्या समस्या निवडून निश्चित कार्यक्रम ठरवून त्याआधारे जनसंघटन करण्याची गरज असते. यासाठी कोणतीही चळवळ उभी करण्यासाठी लोकांचा सक्रिय पाठिंबा आवश्यक असतो.

**(3)** हे विधान चूक आहे; कारण –

(१) वाढत्या जमातवादाने देशात धार्मिक संघर्ष सुरू होतात.

(२) वाढत्या संघर्षामुळे समाजात धार्मिक तेढ निर्माण होऊन सामाजिक ऐक्य नष्ट होते.

(३) समाजात दुही निर्माण होऊन दहशतवादी घटना घडून येतात. परिणामी, सामाजिक स्थैर्य व स्वास्थ्य नष्ट होऊन लोकशाही धोक्यात येते. म्हणून जमातवादाने देशाचे अतोनात नुकसान होते.

**प्र. 8. (अ)**

**(1) अल्पसंख्याकविषयक तरतुदी :**

(१) अल्पसंख्याकांच्या अधिकारांचे रक्षण व्हावे व त्यांचा विकास व्हावा, यासाठी संविधानात या वर्गासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

(२) धर्म, वंश, भाषा, जात, प्रदेश इत्यादी घटकांवर आधारित भेदभावांना प्रतिबंध करण्यात आला आहे.

(३) अल्पसंख्याकांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी शासन विविध योजना राबवीत आहे.

(४) अल्पसंख्याकांची भाषा, संस्कृती, लिपी, धर्म यांचे रक्षण करण्यासाठी संविधानात अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**(2) कामगार चळवळ :**

(१) १८५० नंतर भारत कापड गिरण्या, रेल्वे कंपन्या असे उद्योग सुरू झाले. या औद्योगिकीकरणामुळे देशात कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला.


(२) पुढे त्यांच्या समस्या वाढल्या. या समस्या सोडवण्यासाठी १९२० मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस' स्थापन होऊन कामगार चळवळी जोम धरू लागल्या.

(३) स्वातंत्र्योत्तर काळातही कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक युनियन्सची स्थापना झाली. १९६० ते १९८० पर्यंत कामगार चळवळींचा प्रभाव होता. १९८० नंतर मात्र मुंबईतील कापड गिरणी कामगारांचा संप अयशस्वी झाल्यानंतर हळूहळू ही चळवळ विखुरली गेली व कमकुवत झाली.


(४) जागतिकीकरण आणि कंत्राटी कामगार पद्धतीने कामगार चळवळीवर मोठा आघात झाला आहे.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2) राष्ट्रीय पक्षांच्या स्थापनेसंदर्भातील कालरेषा :**



**प्र. 9.**

**(1)** (१) भारतीय निवडणूक आयोग या यंत्रणेत एक मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य दोन निवडणूक आयुक्त असतात. तिघांनाही समान अधिकार असतात.

(२) या आयुक्तांची निवड राष्ट्रपतींकडून होते. प्रशासकीय सेवेतील अनुभवी व्यक्तींची या पदासाठी निवड केली जाते.

(३) संसदेच्या आणि विधिमंडळाच्या प्रतिनिधींच्या निवडणुका निष्पक्ष आणि खुल्या वातावरणात घेण्याची जबाबदारी मुख्य निवडणूक आयुक्ताची असते.

(४) निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य जपण्यासाठी आयुक्तांना सहजासहजी वा राजकीय कारणासाठी पदभ्रष्ट करण्याचा अधिकार संविधानाने कोणालाही दिलेला नाही.

**(2)** राजकीय पक्ष पुढील कामे करतात–

(१) आपल्या धोरणांचा आणि कार्यक्रमांचा प्रचार करून निवडणुका लढवतात.

(२) सत्ता मिळाल्यास आपल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करतात. ज्यांना सत्ता मिळाली नाही ते आपल्या कार्यक्रमाच्या आधारे लोकांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतात.

(३) जनतेच्या मागण्या व तक्रारी शासनापर्यंत पोहोचवतात व शासनाची धोरणे व योजना जनतेपर्यंत नेतात.

(४) शासनाच्या अकार्यक्षमतेवर टीका करून त्यावर अंकुश ठेवतात.